

# -: श्री. संत नामदेव :-

विक्रम आणि वैराग्य जिथे हातात हात घालून नांदतात असा प्रांत म्हणजे महाराष्ट्र. छत्रपती शिवाजी महाराज तसेच अनेक थोर क्रांतिकारकांच्या रूपानं शौर्याचा वारसा जिथे आहे तिथेच संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम यांच्यासारख्या अनेक संतांच्या मांदीयाळीच्या रूपानं महाराष्ट्राला वैराग्याचा, परमार्थाचा, समृद्ध वारसा मिळाला. याच वारकरी परंपरेतील भागवत धर्माचा प्रसार ज्यांनी महाराष्ट्राबाहेर जाऊन केला अशा थोर संत नामदेवांबद्दल जाणून घेऊया.

संत नामदेवांचा जन्म २६ ऑक्टोबर १२७० रोजी झाला. काहींच्या मते त्यांचा जन्म हिंगोली जिल्ह्यातील नरसो नामदेव या गावी झाला तर काहींच्या मते वडील त्यांच्या जन्मापूर्वी पंढरपूर येथे गेले त्यामुळे पंढरपुरात झाला असे म्हणतात. त्यामुळे जन्मगावाबद्दल नक्की सांगता येत नाही. त्यांच्या आईचे नाव गोणाई होते तर वडिलांचे नाव दामाशेरी रेळेकर असे होते. त्यांचा जन्म शिंपी कुटुंबात झाला त्याबद्दल ते म्हणतात...

शिंपी याचे कुळी जन्म माझा । झाला परी जीव गुंतला सदाशिवि||

दिसा माझी शिवी रात्री माझी| शिवी अराणूक जीवी नाही मज||

नामा म्हणे शिवी विठोबाची अंगी| तेणे झालो जगी धन्य धन्य||

त्यांच्या पत्नीचे नाव राजाई आणि मुलीचे नाव लिंबाही त्यांना नारा , गोंदा , म्हादा, विटा असे चार मुलगे होते. त्यांनी आपल्या संपूर्ण कुटुंबालाच विठ्ठल भक्तीची ओढ लावली. इतकच नव्हे तर त्यांच्या घरातील दासी जनाबाई ही सुद्धा विठ्ठल भक्तीत रममाण झाली. तिचेही अभंग प्रसिद्ध आहेत.

संत नामदेवांची विठ्ठल भक्ती इतकी परोपकारीची होती की त्यांनी विठ्ठलाला जेवावयास भाग पाडले. ज्ञानदेव व नामदेव यांची भेट झाली. नामदेवांना तोपर्यंत गुरु नव्हता. नरसी नामदेव गावाजवळ औंढा नागनाथ मध्ये विसोबा खेचर यांना ते भेटले. त्यावेळी विसोबा खेचर हे महादेवाच्या पिंडीवर पाय ठेवून झोपले होते. त्यावेळी नामदेव महाराज त्यांना म्हणाले की तुम्ही असे कसे काय पिंडीवर पाय ठेवून झोपले आहात ? तेव्हा विठोबा खेचर त्यांना म्हणाले की जिथे देव नाही तिथे माझे पाय ठेव, तेव्हा नामदेव महाराजांनी जिथे जिथे त्यांचे पाय ठेवले तिथे तिथे त्यांच्या पायाखाली महादेवाची पिंडी दिसू लागली. त्यावेळी विठोबा खेचर यांनी देवाशिवाय संपूर्ण सृष्टीवर रिकामी जागा नाही. सगळीकडे देव आहे . देव चराचरात भरून राहिला आहे. हा अद्वैताचा सिद्धांत म्हणजेच त्यांच्या जीवनाचे अधिष्ठान बनले. त्यावरूनच त्यांच्या कीर्तनामध्ये कुत्रा भाकरी घेऊन पळाल्यावर तूप घेऊन गेल्याचे ते सांगत. कारण कुत्र्यांमध्ये त्यांनी परमेश्वराला पाहिले.

आपल्या ८० वर्षाच्या आयुष्यात त्यांनी भारतभर प्रवास केला. पंजाब मध्ये त्यांनी शीख धर्माच्या उभारणीत मोलाचे कार्य केले. उत्तर प्रदेश, गुजरात, राजस्थान या राज्यात सुद्धा त्यांनी भागवत धर्माचा प्रचार व प्रसार केला. ते मराठीतील व हिंदीतील पहिले कवी होते. त्यापूर्वी लोकगीते होती. सर्व हिंदी संत कवींवर त्यांच्या कवितांचा प्रभाव आहे. विशेषतः संत कबीरांवर त्यांच्या कवितांचा तसेच समतेच्या विचारांचा खूप प्रभाव पडला आणि तो त्यांच्या रचनातून आपल्याला दिसतो.

त्यांचे मराठी अभंग आपणा सर्वांच्या ओठांवर आहेतच. त्यांच्या प्रचंड ग्रंथसंपदेबद्दल जागे अभावी लिहिणे शक्यच नाही. त्यांची विठ्ठलाची आरती, घालीन लोटांगण हे महाराष्ट्रातील आबाळवृद्धांच्या ओठांवर आहे .

अशा या थोर संतांचे जीवन कार्य ३ जुलै १३५० मध्ये संपले. आज ही पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात नामदेव पायरीच्या रूपात ते आपल्याला भेटतात.

- -सौ.मंजिरी संजीव देशपांडे.

व्यक्तिरेखा -

१. विठ्ठल - श्री. सुर्यकांत कुलकर्णी.

२. संत नामदेव - श्री. भूषण गरुड.

३. गावकरी - श्री. गणेश धावडे.

श्री. अभिषेक मुळे.

प्रतीक्षा मोरे.

सोनाली खंडागळे.

नेपथ्य -

१. श्री. शंतनू देशमुख.
२. श्री. अद्वैय मुंढे.
३. श्री. सर्वेश उमराणी.
४. श्री. सारंग चव्हाण.
५. श्री. हृषीकेश गोसावी.

लोकेशन -

क्षेत्र माहुली, सातारा

रंगभूषा -

श्री. गणेश सावंत.

वेशभूषा -

१. सौ. आसावरी पंडित

२. श्री. गणेश सावंत.

३. सौ. स्वप्नजा बर्वे.

छायाचित्रण -

श्री. कल्पेश पाटसकर.

लायटिंग विभाग -

१. श्री. अद्वैय मुंढे.
२. श्री. शंतनू देशमुख.
३. श्री. महेश पुजारी.
४. श्री. गिरीश कुलकर्णी.
५. श्री. गणेश सावंत.

फोटो एडिटिंग -

१. श्री. राजेंद्र बिळासकार.

चित्र (स्केच) -

१. अद्वैय मुंढे.

लेखन विभाग -

- लेखन विभाग प्रमुख - श्री. राजेंद्र आलोणे.
- लेखन - सौ.मंजिरी संजीव देशपांडे.
- लेख संकलन -

  -श्री. दीपक आफळे.

- ध्वनीमुद्रण - सौ. अवंती कुलकर्णी.
- ध्वनिमुद्रिका -